प्रेस नोट दिनांक ११/०७/२०१९

# चंदननगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## शालेय मिटींग घेवुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले बाबत.

चंदननगर पो.स्टे. हद्दीमधील सुंदराबाई शाळेमध्ये पोलीस स्टेशनकडील कर्मचारी पोहवा. हरीदास कदम, पोहवा. बापु भुजबळ, मपोना. मेहरुबीन मुजावर, पोशि. पांडुरंग नाणेकर यांनी दिनांक ११.०७.१९ रोजी १२.३० ते १३.१५ वा. दरम्यान मिटींग आयोजित केली होती. मिटींगमध्ये विद्यार्थ्यांना सोशल मिडीयाव्दारे होणारी फसवणुक, बँकांचे एटीएम कार्डव्दारे होणारी फसवणुक, सायबर क्राईम, यासंबधाने मार्गदर्शन करण्यात आले आहे. मुलांनी त्यांचे अडीअडचणींबाबत पालकांचे माध्यमातुन किंवा शिक्षकांचे माध्यमातुन पोलीसांकडे संपर्क साधणेसाठी आवाहन करण्यात आले आहे. तसेच मुलांनी अंमलीपदार्थ, तंबाखुजन्य पदार्थांपासुन दुर राहुन व्यसनाधिन न होता स्वतःचे करीयर करावे, अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत.




